ज्ञानवर्धिनी संस्थेचे

# सोनुभाऊ बसवंत कला व वाणिज्य महाविद्यालय, शहापूर

## महिला विकास कक्ष

---

### ‘राजमाता जिजाऊ जयंती’ आणि ‘स्वामी विवेकानंद जयंती (राष्ट्रीय युवा दिन)’ निमित्त नशामुक्त भारत अभियान अंतर्गत अमली पदार्थ विरोधी शपथ, जनजागृती कार्यक्रम व ग्रंथ प्रदर्शन’

### अहवाल

सोमवार, दि. १२ जानेवारी, २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता **अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्ष, महिला विकास कक्ष (WDC), राष्ट्रीय सेवा योजना , राष्ट्रीय छात्र सेना आणि ग्रंथालय विभाग** यांच्या संयुक्त विद्यमाने **‘राजमाता जिजाऊ जयंती आणि ‘स्वामी विवेकानंद जयंती (राष्ट्रीय युवा दिन)’ निमित्त नशामुक्त भारत अभियान अंतर्गत अमली पदार्थ विरोधी शपथ, जनजागृती कार्यक्रम व ग्रंथ प्रदर्शन’** आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या आयोजनाची उद्दिष्ट्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राजमाता जिजाऊ यांच्या राष्ट्रनिर्मितीतील संस्कारमूल्ये व स्वामी विवेकानंद यांच्या युवशाक्तीविषयक विचारांची जाणीव निर्माण करणे, विद्यार्थ्यांमध्ये नशामुक्त भारत अभियान अंतर्गत अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत जागरुकता निर्माण करणे, अमली पदार्थ विरोधी शपथ कार्यक्रमाद्वारे सामाजिक जबादारी, आत्मसंयम व आरोग्याबाबतची सजगता वाढवणे आणि महिला विकास कक्षाच्या माध्यमातून  सुरक्षित, सुदृढ व नशामुक्त कॅम्पस संस्कृती निर्माण करणे ही होती.  या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून डॉ. राजू शनवार हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे उपप्राचार्य  डॉ.संतोष गायकवाड यांनी भूषविले.

प्रमुख वक्ते डॉ. राजू शनवार यांनी नशामुक्त भारत अबियानाची संकल्पना व त्यातील युवकांची भूमिका, अमली पदार्थांचे शारीरिक, मानसील व शैक्षणिक दुष्परिणाम, नशामुक्त जीवनशैली याबाबत मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. सदर उपक्रमास महाविद्यालयातील ११ प्राध्यापक आणि ४१ विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय छात्र सेना युनिटचे प्रमुख लेफ्टनंट डॉ. संतोष बुधवंत यांनी केले. तर आभार प्रदर्शन महिला विकास सदस्य प्रा. स्वाती जाधव यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. अनिलकुमार सिंह, उपप्राचार्य डॉ. संतोष गायकवाड, IQAC समन्वयक प्रो. डॉ. शहाजी वाघमोडे, महिला विकास कक्षाच्या समन्वयक डॉ. सीमा परटोले, WDC सदस्य डॉ. अश्विनी ओव्हाळ, प्रा. निशीगंधा जगे, प्रा. अर्चना घनघाव, प्रा. सरला कातकाडे, प्रा. स्वाती फर्डे,  प्रा. मोनिका बांगर, प्रा. स्वाती जाधव, महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत गायनाने झाली.